# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेस नोट

- **मिरा-भाईंदर महानगरपालिका ग्रंथालय विभाग अंतर्गत अभ्यासकेतील विशेष प्राविण्य संपादन केलेला विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन) येथील ग्रंथालय विभाग अंतर्गत अभ्यासिकेतील विशेष प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात पार पडला . अभ्यासिकातील सर्व विद्यार्थ्यांनी या सत्कार सोहळ्याला भरघोस असा प्रतिसाद दिला.अभ्यासिकेत सचोटीने अभ्यास करत आपल्या स्वप्नांना मूर्त स्वरूप देणारे CA उत्तीर्ण ३८ विद्यार्थी तसेच MPSC उत्तीर्ण ३ विद्यार्थी आणि MBBC with NEET PJ ची तयारी करणारे १० विद्यार्थी असे मिळून जवळजवळ ५० विद्यार्थ्यांना शाल,प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यावेळी भावूक झालेल्या या विद्यार्थ्यांनी अभ्यासिके प्रती आपल्या भावनांना वाट करून दिली. मीरा-भाईंदर महापालिकेच्या अभ्यासिकेने अशाप्रकारे पहिल्यांदाच विद्यार्थ्यांसाठी सत्कार सोहळा आयोजित केल्याने या विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा होता या सगळ्या विद्यार्थ्यांनी माननीय आयुक्त आणि मीरा-भाईंदर महापालिकेचे तसेच शहरात कार्यान्वित असलेल्या या सगळया अभ्यासिकांचे मनापासून आभार मानलेत.

या सोहळ्या दरम्यान माननीय आयुक्तांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तर इतर जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांना भविष्यात तुम्ही कसे यश संपादन करावं,कशी मेहनत घ्यावी या विषयी माहिती देत प्रोत्साहन दिले. सध्या मीरा-भाईंदर शहरात एकूण दहा अभ्यासिका असून विविध क्षेत्रातील साधारण सहा ते सात हजार विद्यार्थी या अभ्यासिकेचा मनापासून लाभ घेत आहेत.

इतर शहरात अभ्यासिकेचे प्रति महिना १००० ते २००० असतात पण मिरा भाईंदर महानगरपालिका मात्र केवळ १२५ रुपये नाममात्र शुल्क दर वर्षाला घेते या अभ्यासिकेत विविध क्षेत्रातील एकूण ६० हजार पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सगळ्या प्रकारची पुस्तकं उपलब्ध करून देत मीरा भाईंदर महापालिकेने त्यांच्या भविष्यातील असलेला स्वप्नांना खऱ्या अर्थाने बळ दिले आहे त्यामुळेच आज मीरा-भाईंदर शहरातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षा सोबत इतर क्षेत्रामध्ये भरघोस यश संपादन करीत आहेत आज अश्या अभ्यासिकेमुळे मीरा-भाईंदर शहरातील गरीब गरजू विद्यार्थी खऱ्या अर्थाने आपल्या आयुष्याला यशस्वी रित्या मार्गस्थ होताना दिसत आहे.

या सत्कार सोहळ्याला मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर(भा.प्र.से.) यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, शहर अभियंता दिपक खांबित, उपायुक्त (मु.) संजय दोंदे, सहाय्यक आयुक्त सुनील यादव, सहाय्यक आयुक्त सुधाकर लेंडवे तसेच ग्रंथपाल आणि विभाग प्रमुख भारती सांगळे यांच्या सोबत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. आपापल्या क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेले हे विद्यार्थी उद्याच्या मीरा-भाईंदर शहराच्या विकासासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच भरीव कामगिरी करतील यात कसली शंका नाही तसेच मीरा भाईंदर शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकांचा लाभ घ्यावा आणि आपण पाहत असलेला स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी मेहनत करा यश नक्की तुमचेच असेल असे प्रोत्साहित करत मीरा-भाईंदर महापालिका कायम तुमच्या पाठीशी राहील असे आश्वासन माननीय आयुक्तांनी दिले.

२२.०९.२०२४

सहाय्यक आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका